२

स्वातंत्र्य सैनिकांना द्यावयाचे निवृत्तीवेतन व आर्थिक सहाय्यात वाढ ....

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्रमांक:पीओएस 1292/प्र.क्र.102/92/स्वासैकक्ष,
मंत्रालय, मुंबई 400 032. दिनांक 22 ऑक्टोबर 1993.

पहा:-
(1) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओअेस-1082/विक-1/स्वासै, दिनांक 16 फेब्रुवारी 1982.
(2) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओएस-1082/विक-1/स्वासै, दिनांक 6 सप्टेंबर 1982.
(3) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओएस-1082/विक-1/स्वा.सै., दिनांक 24 डिसेंबर 1982.
(4) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओएस-1283/1165/विक-1/स्वा.सै., दिनांक 17 जून 1983.
(5) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओएस-1083/577/विक-1/स्वासै, दिनांक 3 ऑगस्ट 1983.
(6) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओअेस-1083/विक-1/स्वासै, दिनांक 21 सप्टेंबर 1983.
(7) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओअेस-1283/विक-1/स्वासै, दिनांक 21 नोव्हेंबर 1983.
(8) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओअेस-1285/विक-1/स्वासै, दिनांक 12 ऑगस्ट 1985.
(9) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओअेस 1285/(2)/स्वासै, दिनांक 22 जानेवारी 1986.
(10) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओअेस-1287/विप्रभ/स्वासै, दिनांक 3 ऑगस्ट 1987.
(11) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओअेस-1088/स्वासैक, दिनांक 21 एप्रिल 1989.
(12) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओअेस-1090/प्र.क्र.77/90/स्वासैकक्ष, दिनांक 1 नोव्हेंबर 1990.
(13) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओअेस 1090/प्र.क्र.77/90/स्वासैकक्ष, दिनांक 26 डिसेंबर 1990.
(14) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओअेस 1290/614/सीएमएस/स्वासैकक्ष, दिनांक 9 सप्टेंबर 1991.
(15) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओअेस 1291/प्र.क्र.~~185~~ 184/91/स्वासैकक्ष, दिनांक 22 नोव्हेंबर 1991.

शामुमु-रोटा-सप्रवि-एच-952(2,000-10-93)-1

(16) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओएस 1292/प्र.क्र.102/92/स्वासैकक्ष, दिनांक 7 ऑगस्ट 1992. (प्रत सोबत जोडली आहे)

**शासन शुध्दीपत्रक**:- चलेजाव चळवळीच्या सुवर्ण महोत्सव सोहळयाच्या निमित्ताने दिनांक 9 ऑगस्ट 1992 रोजी शासनाने स्वातंत्र्य सैनिक निवृत्तीवेतन धारकांच्या वेतनात व अन्य आर्थिक सहाय्यात व इतर सवलतीत वाढ करण्याचे निर्णय घेऊन तत्संबंधी आदेश दिनांक 7 ऑगस्ट 1992 च्या उपरोल्लेखीत शासन निर्णयान्वये काढले होते. त्यातील काही निर्णयात शासनाने सुधारणा करण्याचे ठरविले असून ते निर्णय खालीलप्रमाणे आहेत:-

| शासनाने दिनांक 7 ऑगस्ट 1992 च्या निर्णयान्वये जाहीर केलेली सवलत | सुधारित सवलत/स्पष्टीकरण |
|---|---|
| 1. महिला स्वातंत्र्य सैनिकांना मिळणा-या निवृत्तीवेतनात वाढ करुन त्यांना दरमहा रु.500/- ऐवजी रु.600/- निवृत्तीवेतन देण्यात यावे. | हे निवृत्तीवेतन फक्त राज्य महिला स्वातंत्र्य सैनिकांना असून दिवंगत स्वातंत्र्य सैनिकांच्या विधवा पत्नीला लागू नाही. |
| 2. स्वातंत्र्य सैनिक मृत झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना रु.3,000/- आर्थिक सहाय्य देण्यात यावे. | 2. स्वातंत्र्य सैनिक मृत झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना रु.3,000/- ऐवजी रु.5,000/- आर्थिक मदत देण्यात यावी, असे शासन आदेश देत आहे. |
| 3. स्वातंत्र्य सैनिकास कायमस्वरुपी अथवा अंशतः अपंगत्व आल्यास रु.3,000/- आर्थिक सहाय्य देण्यात यावे. | 3. स्वातंत्र्य सैनिकास कायमस्वरुपी किंवा अंशतः अपंगत्व आल्यास रु.3,000/- ऐवजी रु.5,000/- आर्थिक सहाय्य देण्यात यावे, असे शासन आदेश देत आहे. |

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पीओएस 1292/प्र.क्र. 102/92/स्वासैकक्ष, दिनांक 7 ऑगस्ट 1992 मधील अनु क्र. 5 मध्ये नमूद केलेला शासन निर्णय, क्रमांक पीओएस-1082/विक-1/स्वासै, दिनांक 24 डिसेंबर 1982 ऐवजी शासन निर्णय, क्रमांक पीओएस-1285/(2)/स्वासैकक्ष, दिनांक 22 जानेवारी 1986 असे वाचावे.

3. या संदर्भात होणारा खर्च "2235-सामाजिक सुरक्षा व कल्याण
102(1) स्वातंत्र्य सैनिक व त्यांचेवर अवलंबून असणा-या व्यक्ती इत्यादींना निवृत्तीवेन.
मागणी क्रमांक ए-14"
या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली खर्ची दाखविण्यात यावा व त्या खालील अनुदानातून भागविण्यात यावा.

4. हे आदेश दिनांक 9 ऑगस्ट 1992 पासून लागू आहेत.

5. हे आदेश वित्त विभागाच्यासहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर-824/92/व्यय-4, दिनांक 13 ऑगस्ट 1992 तसेच संदर्भ क्रमांक सीआर 1020/93/व्यय-4/, दिनांक 30 सप्टेंबर 1993 अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

चं.रा. चव्हाण,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

एच-952(2,000-10-93)-13

शासन शुध्दीपत्रक क्रमांक पीओएस 1292/प्र.क्र.102/92/स्वासेकक्ष, दिनांक 22 ऑक्टोबर 1993 चे सहपत्र.

स्वातंत्र्य सैनिकांना द्यावयाच्या सवलतीत वाढ ....

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: पीओएस-1292/प्र.क्र.102/92/स्वासेकक्ष,
मंत्रालय, मुंबई 400 032. दिनांक 7 ऑगस्ट 1992.

**निर्णय:-** महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांना आर्थिक अनुदान व ज्या इतर शासकीय सवलती देण्यात येतात त्यापैकी खाली उल्लेख केलेल्या बाबींबाबत विचाराअंती शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

| अ. क्र. | सध्याची सवलत व आर्थिक अनुदान | याबाबत आधार असलेला शासन निर्णय | नवीन निर्णय |
|---|---|---|---|
| 1. | स्वातंत्र्य सैनिकांना मासिक निवृत्तीवेतन रु.500/- देण्यात येते. | क्रमांक:पीओएल-1090/प्र.क्र.77/90/स्वासेकक्ष, दिनांक 1 नोव्हेंबर 1990. | महिला स्वातंत्र्य सैनिकाच्या बाबतीत शासन आता असे निदेश देत आहे की, त्यांच्या मासिक निवृत्ती वेतनामध्ये दरमहा रु.100/- अशी वाढ करावी. म्हणजेच त्यांना दरमहा रु.600/- निवृत्ती वेतन देण्यात यावे. |
| 2. | स्वातंत्र्य सैनिक मृत झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना रु.2,000/- आर्थिक सहाय्य देण्यात येते. | क्रमांक:पीओएस-1082/विक-1/स्वासे, दिनांक 24 डिसेंबर 1982. | शासन आता असे निदेश देत आहे की, हे आर्थिक सहाय्य वाढवून रु.2000/- ऐवजी रु.3,000/- देण्यात यावे. |
| 3. | स्वातंत्र्य सैनिकाला कायमस्वरुपी किंवा अंशत: अपंगत्व आल्यास रु.2,000/- सहाय्य दिले जाते. | क्रमांक:पीओएस-1082/विक-1/स्वासे, दिनांक 24 डिसेंबर 1982. | शासन आता असे निदेश देत आहे की, रु.2,000/- ऐवजी रु.3,000/- आर्थिक सहाय्य देण्यात यावे. |
| 4. | कर्करोग, क्षय रोग व इतर - 5 रोगांने आजारी असल्यास स्वातंत्र्य सैनिकाला रु.3,000/- आर्थिक सहाय्य देण्यात येते. | (1) पीओएस-1290/614/सीएमएस/स्वासेकक्ष, दिनांक 9 सप्टेंबर 1991 व (2) पीओएस-1291/प्र.क्र.184/91/स्वासेकक्ष, दिनांक 22 नोव्हेंबर 1991. | शासन आता असे निदेश देत आहे की, कर्करोग व क्षय रोग या दोन्हीपैकी कोणत्याही एका रोगाने आजारी असल्यास स्वातंत्र्य सैनिकाला रु.3000/- ऐवजी रुपये 5000/- एवढे आर्थिक सहाय्य देण्यात यावे. शासन निर्णय, दिनांक 9 सप्टेंबर 1991 मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे हे आर्थिक सहाय्य एकदाच देय राहील. |
| 5. | स्वातंत्र्य सैनिकाच्या विधवेला अपंगत्वासाठी रु.2000/- व वैद्यकीय उपचारासाठी रु.2000/- देण्यात येतात. | क्रमांक:पीओएस-1082/विक-1/स्वासे,दिनांक 24 डिसेंबर 1982. | शासन आता असे निदेश देत आहे की, अपंगत्वासाठी रु.2500/- व वैद्यकीय उपचारासाठी रु.2500/- असे एकूण रुपये 5000/- देण्यात यावेत. हे आर्थिक सहाय्य स्वातंत्र्य सैनिकांच्या विधवांना एकदाच देय होईल. |

| | | |
|---|---|---|
| 6. स्वातंत्र्य सैनिक आणि त्याची/तिची पत्नी/पती अथवा एक साथीदार यांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमधून विनामूल्य प्रवास अनुज्ञेय आहे. | क्रमांक: पीओएस-1090/प्र.क्र. 77/90/स्वातंकक्ष, दिनांक 26 डिसेंबर 1990. | शासन आता असे निदेश देत आहे की, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांची बससेवा महाराष्ट्र राज्याबाहेर ज्या स्थानकापर्यन्त जाते त्या शेवटच्या स्थानकापर्यन्त व तेथून परत मूळ मुक्कामी येण्यासाठी विनामूल्य प्रवास करण्याची सवलत देण्यात यावी. |

2. उपरोक्त निर्णय दिनांक 9 ऑगस्ट 1992 पासून अंमलात येत आहे.

3. हा निर्णय गृह विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे (वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक सीआर-799/92/व्यय-4, दिनांक 7 ऑगस्ट 1992).

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

चं.रा. चव्हाण,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

—

एच-952(2,000-10-93)-3